**उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील सॉफ्टवेअर व हार्डवेअरची खरेदी, ई प्रशासन धोरणांची अंमलबजावणी, माहिती व तंत्रज्ञान प्रकल्प व अनुदान निर्धारण प्रणाली (Grant Determination Project) प्रकल्प याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समिती गठित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:अर्थसं-२०२५/ प्र.क्र.१४९/ ई-१३०६०७१/मशि-३,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०००३२.
दिनांक: २५ नोव्हेंबर,२०२५.

**<u>संदर्भ</u>:- १.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीओएम १००१/प्र.क्र.१७४/०१/३९, दि.२९.१०.२००१

**२.**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मातंस नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९, दि.१८.६.२०१०

**३**. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मातंस-२०११/प्र.क्र.१२५/३९, दि.२३.९.२०११

**<u>प्रस्तावना -</u>**

शासकीय कामाकाजाचे संपूर्ण संगणकीकरण करण्यासाठी संदर्भ क्र. १ येथील दि.२९.१०.२००१ च्या शासन निर्णयाव्दारे कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहेत. यानुसार ज्या प्रकल्पामध्ये हार्डवेअर काम्पोनंटची खरेदी रु.५.०० लक्ष पेक्षा जास्त व सॉफ्टवेअर काम्पोनंटची खरेदी रु.२.०० लक्ष पेक्षा जास्त असेल असे संगणकीकरणाचे प्रकल्प राबविण्यासाठी संबंधीत विभागांनी संबंधीत प्रधान सचिव/ सचिव यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती स्थापन करणे आवश्यक आहेत, तसेच, संदर्भ क्र. २ येथील दि.१६.६.२०१० च्या शासन निर्णयाव्दारे विभागाच्या एकूण उपलब्ध तरतूदींच्या अर्धा टक्क्यापर्यंत निधी ई गव्हर्नन्सकरिता राखून ठेवण्यात यावा व हा निधी खर्च करताना प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे संदर्भ क्र. ३ येथील दि.२३.९.२०११ च्या शासन निर्णयाब्दारे जाहिर करण्यात आलेल्या ई प्रशासन घोरणानुसार ई-प्रशासन प्रकल्पावर देखरेख करण्याची जबाबदारी प्रकल्प अंमलबजावणी समितीवर ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रकल्प अमलबजावणी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

उच्च  शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अनुदान निर्धारण प्रणाली प्रकल्प (Grant Determination Project) व भविष्यात येणा-या माहिती व तंत्रज्ञान (संगणकीकरण) प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तसेच ई-प्रशासन धोरणांतर्गत सर्व प्रकल्पावर देखरेख करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मख्य सचिव प्रधान सचिवसचिव/, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | -अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग अथवा त्यांचे प्रतिनिधी | -सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, वित्त विभाग अथवा त्यांचे प्रतिनिधी | -सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, माहिती व तत्रज्ञान विभाग अथवा त्यांचे प्रतिनिधी | -सदस्य |
| ५. | उप सचिव (मशि), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | -सदस्य |
| ६. | उद्योग सहसचालक (भाडार खरेदी)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी | -सदस्य |
| ७. | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ व गट-ब दर्जाचा लेखाधिकारी (आवश्यकतेनुसार) | -सदस्य |
| ८. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | -सदस्य सचिव |

**२.** उच्च  शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील रु.५.०० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या हार्डवेअर काम्पोनंटच्या व रु.२.०० लाख पेक्षा जास्त रक्कमेच्या सॉफ्टवेअर काम्पोनंटच्या खरेदीचे प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी समिती समोर मान्यतेसाठी ठेवण्यात यावेत. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अनुदान निर्धारण प्रणाली प्रकल्प व भविष्यात येणा-या माहिती व तंत्रज्ञान प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तसेच ई-प्रशासन धोरणांतर्गत सर्व ई-प्रशासन प्रकल्पावर देखरेख करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता आवश्यक असलेले सर्व प्रस्ताव, प्रकल्प अंमल बजावणी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात यावेत. प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेशिवाय अशा प्रकारची कोणतीही खरेदी करण्यात येऊ नये.

**३.** उच्च  शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अनुदान निर्धारण प्रणाली (Grant Determination Project) व इतर भविष्यात येणा-या माहिती व तंत्रज्ञान प्रकल्पाच्या (IT Project) अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

१. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत सादर करण्यात आलेल्या माहिती व तंत्रज्ञान प्रकल्पांच्या निविदा मसुद्याला (RFP) तत्वत: मंजूरी देऊन अंतिम मान्यतेकरिता शासनास शिफारस करणे.

२. संचालनालयाच्या स्तरावरील तांत्रिक समितीने पात्र ठरविलेल्या निविदाकारांमधून न्यूनतम निविदाकाराची (L१) निवड करून  अंतिम मान्यतेस्तव शासनास शिफारस करणे.

**४.** प्रकल्पासाठी वेळोवेळी आवश्यक ठरणा-या तांत्रिक बाबींसाठी तसेच तांत्रिक मूल्यांकन (Technical evaluation) करून निविदाकाराची पात्रापात्रता ठरविणे आणि व्यावसायिक प्रक्रिया कार्यान्वीत करण्याच्या अनुषंगाने (Commercial opening) अंतिम मंजूरीसाठी प्रकल्प अंमलबजावणी

समितीस तांत्रिक मूल्यांकन परिणाम (Technical evaluation Assessment) सादर करण्याकरीता संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती (Technical Committee) स्थापन करावी.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५११२५१५२३०८०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.11.25 15:24:07 +05'30'

**( अशोक मांडे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुबई
३. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुबई
५. संचालक, माहिती व तत्रज्ञान संचालनालय, मुंबई
६. उप सचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुबई
७. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुबई
८. निवड नस्ती/मशि-३.